आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५वाजता
१४ मार्च २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देश विदेशात वैविध्यपूर्ण पद्धतीनं साजरा झाला होळी आणि धूलिवंदनाचा सण

- प्रधानमंत्री गतिशक्ती प्रकल्पाच्या नेटवर्क प्लॅनिंग गटाच्या बैठकीत बदलापूर-कर्जत रेल्वेमार्गासह विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांचा आढावा

- उपग्रह प्रक्षेपणातून इस्रोनं १० वर्षात कमावले १४३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेते आणि चित्रपट निर्माते देब मुखर्जी यांचं निधन

**<><><><><>**

होळी आणि धूलिवंदनाचा सण आज देशाच्या विविध भागांमध्ये स्थानिक संस्कृती आणि वैविध्यपूर्ण पद्धतींनी साजरा झाला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून-

**<u>होल्ड... व्हीसी</u>**

***महाराष्ट्रात*** *सर्वत्र आज नागरिकांनी होळीचा आनंद लुटला.* ***यवतमाळच्या*** *बोरी इथं गदाजी महाराजांच्या यात्रेदरम्यान गोटमार होळी, जालना शहरातली पारंपरिक हत्ती रिसाला मिरवणूक,* **नंदुरबारची** *काठी होळी अशा विविध परंपरांचं जतन करतानाच नाविन्याची जोड दिल्याचंही बघायला मिळालं. याशिवाय, देशाच्या विविध भागात उत्साहात होळी आणि धूलिवंदन साजरं झालं.*

***मध्य प्रदेशात*** *उज्जैनच्या भगवान महाकाल मंदिरात पहाटे चार वाजता मूर्तीला गुलाल लावला गेला. राजधानी भोपाळमध्ये शेकडो लोकांनी एकत्र येत*

*होळीचा आनंद लुटला. राज्यातल्या धार्मिक स्थळांवरही भाविकांची गर्दी पाहायला मिळाली.*

***गुजरातमध्ये*** *आज होळी आणि धुलेतीसोबतच फूल दोलोत्सव आणि फाल्गुनी पौर्णिमेचाही उत्साह होता.*

*एकमेकांवर रंगांची उधळण करत* ***तेलंगणमध्ये*** *नागरिकांनी उत्साहात होळीचा आनंद लुटला. इथल्या उत्तर भारतीय समुदायांनी काल रात्री होलिका दहनात भाग घेतला.*

***राजस्थानमध्येही*** *पारंपरिक नृत्य आणि वाद्यमेळांच्या तालात होळी साजरी झाली. जयपूरमधल्या प्रसिद्ध गोविंद देवजी मंदिरात गुलाल होळी खेळण्यात आली.*

*गेल्या अनेक काळापासून हिंसाचारग्रस्त असलेल्या* ***मणिपूरमध्ये*** *सलग दुसऱ्या वर्षी होळीचा फारसा उत्साह दिसला नाही. इथल्या बहुसंख्यक मैतेई समुदायाच्या पाच दिवस चालणाऱ्या याओसांग उत्सवाला आज संध्याकाळी सुरुवात झाली.*

***जागतिक पॅराॲथलेटिक्स ग्रँड प्री स्पर्धेत*** *सहभागी झालेल्या २० देशांच्या क्रीडापटूंनीही आज नवी दिल्लीत स्पर्धेच्या समारोपानंतर होळी साजरी केली.*

*हा सण फक्त भारतापुरता मर्यादित न राहता पाकिस्तानातल्या* ***लाहोर*** *इथल्या श्रीकृष्ण मंदिरातही होळीचा उत्साह पाहायला मिळाला. यासाठी कडक सुरक्षाव्यवस्था तैनात करण्यात आली होती.*

***आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून अंकिता आपटे***

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथे कोणत्याही प्रकारचा तणाव नाही, शिमगोत्सव साजरा करताना तिथे प्रार्थनास्थळावर हल्ला झाल्याची माहिती चुकीची असल्याचं जिल्हा पोलीस अधीक्षक धनंजय कुलकर्णी यांनी स्पष्ट केलं आहे. हुल्लडबाजी केल्याप्रकरणी काही जणांवर गुन्हा दाखल करून तपास सुरू

आहे, असं ते म्हणाले. राजापूर शहरात चोख पोलीस बंदोबस्त असला तरी तिथे कोणत्याही प्रकारचा तणाव नाही. समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह मजकूर प्रसृत करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशाराही त्यांनी दिला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री गतिशक्ती अंतर्गत नेटवर्क प्लॅनिंग गटाच्या ८९ व्या बैठकीत आज रस्ते, रेल्वे आणि मेट्रो क्षेत्रातल्या प्रमुख पायाभूत सेवा प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यात आले. यावेळी चार रस्ते, तीन रेल्वे आणि एक मेट्रो अशा एकूण आठ प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यात आले.

यात बदलापूर - कर्जत दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गिकेच्या कामाचा आढावा घेण्यात आलां. यामुळं मुंबई-पुणे-सोलापूर मार्गावरची प्रवासी आणि मालवाहतुकीची कोंडी दूर व्हायला मदत होईल. तसंच बदलापूर, माथेरान, कर्जतसारख्या भागात राहणाऱ्या नागरिकांना मदत होईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत आतापर्यंत १ लाख ९२ हजार ९३६ सौर उर्जा प्रकल्प बसवून महाराष्ट्रानं देशभरात दुसरं स्थान मिळवल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावर दिली आहे. गेल्या वर्षी १३ फेब्रुवारी पासून सुरु झालेल्या या योजनेत देशभरात १० मार्च २०२५ पर्यंत एकूण १० लाख ९ हजार सौर उर्जा प्रकल्प बसवण्यात आले. या योजनेत महाराष्ट्र आपलं योगदान देत राहील तसंच २०२६-२७ पर्यंत १ कोटी कुटुंबांपर्यंत ही योजना पोहोचवण्याचं उद्दिष्ट असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या २ वर्षात शेअर बाजारात नोंदणी करण्याचं महावितरण अर्थात महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचं नियोजन आहे, अशी माहिती कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा यांनी दिली. वृत्तसंस्थेला दिलेल्या

मुलाखतीत ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच विधानसभेत याचे सूतोवाच केलं होते. येत्या ५ वर्षात नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांपासून मिळणाऱ्या वीजेचे एकूण वीज वितरणातलं प्रमाण १३ टक्क्यांवरुन ५२ टक्क्यांपर्यंत नेण्याचं नियोजन असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

ईशान्य भारत केशराचं केंद्र म्हणून उदयाला येईल, असा विश्वास केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंग यांनी व्यक्त केला आहे. सिंग यांच्या हस्ते आज शिलाँग इथल्या ईशान्य भारतासाठीच्या ‘तंत्रज्ञान अनुप्रयोग आणि प्रसार केंद्राचं’ उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. केंद्र सरकारच्या केसर अभियानाअंतर्गत मेघालय, सिक्कीम आणि अरुणाचल प्रदेशात केशराच्या उत्पादनात मोठी वाढ झाली असून लवकरच नागालँड आणि मणिपूरमध्येही केशरशेती केली जाणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

वेव्हज २०२५ या उपक्रमातल्या विविध स्पर्धांमध्ये देश आणि जगभरातून सुमारे २५ लाखांहून अधिक जणांनी नोंदणी केली होती. त्यातल्या ८० हजारांहून अधिकांनी अर्जही दाखल केले होते. त्यापैकी १ हजारांपेक्षा जास्त जणांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. या उपक्रमाची अंतिम फेरी येत्या १ ते ४ मे दरम्यान मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

इस्त्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं उपग्रह प्रक्षेपणाच्या माध्यमातून सुमारे १४३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचा महसूल मिळवला आहे. इस्त्रोनं गेल्या दशकभरात एकूण ३९३ परदेशी उपग्रहांचं आणि तीन भारतीय

ग्राहकांच्या उपग्रहांचं व्यापारी तत्त्वावर प्रक्षेपण केलं आहे. अमेरिका, इंग्लंड, सिंगापूर यासह ३४ देशांचे उपग्रह इस्रोनं प्रक्षेपित केले आहेत.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेला लंडनच्या सेंट्रल बँकिंग या संस्थेचा २०२५ या वर्षाचा **Digital Transformation Award** जाहीर झाला आहे. बँकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विकसित केलेल्या प्रवाह आणि सारथी या सॉफ्टवेअर करता हा पुरस्कार मिळाला आहे. यामुळं रिझर्व्ह बँकेतल्या अनेक प्रक्रिया कागद विरहित झाल्या आहेत.

**<><><><><>**

पंजाबमधल्या मोगा जिल्ह्यातले शिवसेनेचे जिल्हा प्रमुख मंगत राय यांची काल रात्री गोळ्या झाडून हत्या झाली. त्यांच्यावर तीन अज्ञात व्यक्तींनी गोळीबार केला. मात्र, ती गोळी चुकून एका १२ वर्षांच्या मुलाला लागली. त्यानंतर मंगा हे गाडीवरून पळून गेले. मात्र हल्लेखोरांनी पाठलाग करून पुन्हा त्यांच्यावर गोळीबार केला. जखमी झालेल्या मंगा आणि मुलाला रुग्णालय़ात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी सहाजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ अभिनेते आणि चित्रपट निर्माते देब मुखर्जी यांचं आज सकाळी मुंबई उपनगरातल्या त्यांच्या निवासस्थानी दीर्घ आजारानं निधन झालं ते ८३ वर्षांचे होते. चित्रपट दिग्दर्शक अयान मुखर्जी यांचे ते वडील होते. जुहू इथल्या पवनहंस स्मशानभूमीमधे त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले.

**<><><><><>**

इंग्लंडमध्ये बर्मिंगहॅम इथं सुरू असलेल्या ऑल इंग्लंड खुल्या विजेतेपद बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या खेळाडूंचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या लक्ष्य सेनला चीनच्या ली शिफेंग कडून १०-२१, १६-२१ अशा सेटमध्ये पराभव पत्करावा लागला.

तर महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीला चीनच्या टॅन निंग आणि लिऊ शेंगशु या जोडीनं पराभूत केलं.

**//<><><><><>//**